**लोकसभेच्या एप्रिल-मे,२०१९ मधील सार्वत्रिक निवडणुकीची आचारसंहिता लागू असणे बंद झाल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र विधानमंडळ समित्यांच्या बैठका आयोजित करण्याबाबत....**

# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**परिपत्रक क्रमांक : १००६८/ड-३(समिती समन्वय)**

विधान भवन, मुंबई

दिनांक : ३ जून, २०१९

**संदर्भ :- (१) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.२५७८१/ड-३(समिती समन्वय), दिनांक १६ ऑक्टोबर, २०१८.**

**(२) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.५०६४/ड-३(समिती समन्वय), दिनांक ११ मार्च, २०१९.**

**(३) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.९०७६/ड-३(समिती समन्वय), दिनांक १७ मे, २०१९.**

**(४) Election Commission of India Sr.No.437/6/INST/ECI/FUNCT/MCC/2019. Dated 26 May, 2019.**

## :: परिपत्रक ::

विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्षांना उपरोक्त क्र.२ वरील परिपत्रकान्वये, महाराष्ट्र विधानमंडळाच्या समित्यांनी लोकसभा निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीत विधान भवन, मुंबई येथे अथवा राज्यात इतरत्र कोठेही बैठका आयोजित करण्यात येऊ नयेत, असे कळविण्यात आले होते.

तद्नंतर संदर्भ क्र.३ वरील परिपत्रकान्वये लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीची महाराष्ट्र राज्यातील मतदानाची प्रक्रिया पार पडल्यानंतर फक्त अंतर्गत कामकाजासाठी विधानमंडळ समित्यांच्या बैठका विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यास मा.पीठासीन अधिकाऱ्यांच्या मान्यतेने यापूर्वीच अनुमती देण्यात आली होती.

आता, भारत निवडणूक आयोगाच्या दिनांक २६ मे, २०१९ रोजीच्या संदर्भ क्र.४ वरील पत्रान्वये निवडणूक प्रक्रिया पार पडली असल्याने आदर्श आचारसंहिता संपुष्टात आली आहे. सबब, आता विभागीय सचिवांच्या साक्षीसंदर्भातील विधानमंडळ समित्यांच्या बैठका आयोजित करण्यास देखील याद्वारे अनुमती देण्यात येत आहे. तथापि, राज्यातील दुष्काळ सदृष्य परिस्थिती विचारात घेता विधानमंडळ समित्यांच्या राज्यांतर्गत व राज्याबाहेरील दौऱ्यासंदर्भात मा.पीठासीन अधिकाऱ्यांनी घातलेले निर्बंध यापूर्वीचे संदर्भाधीन

..२/-